# मानवी हक्क

# Human Rights

## Women & Child Development Officer

# CDPO & MPSC Mains

# हक्क म्हणजे काय?

- हक्क म्हणजे प्रत्येक व्यक्तीला समाजाने मान्य केलेला व कायद्याने मंजूर केलेला वाजवी दावा होय.
- हक्क म्हणजे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी पूरक अटी व पोषक वातावरण ज्या अभावी व्यक्तीला आपल्या सुप्त गुणांचा विकास करण्याची संधी मिळणार नाही.
- आधुनिक काळांत व्यक्तींच्या आणि समूहांच्या हक्कांना राज्याची मान्यता असते.
- हक्क हे सत्ताधीशांच्या मर्जीवर अवलंबून राहू नयेत म्हणून राज्यघटनेत लिखित स्वरूपात त्यांची नोंद केलेली असते.

- उदा. अमेरिकेच्या राज्यघटनेत मूलभूत हक्कांचा समावेश केलेला आहे तसेच भारताय संविधानातील याच समावेश भाग III मध्ये केला आहे.

- उदा. समतेचा हक्क, धार्मिक स्वातंत्र्याच हक्क इ. हक्कांचे सरक्षण करण्याचा आणि अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही शासनाचा आहे.

- या हक्कांची पायमल्ली झाल्यास न्यायालयात दाद मागता येते.

# मानवी हक्कांचे स्वरूप

- मानवी हक्क म्हणजे असे हक्क जे माणसाला माणूस म्हणून मिळतात.
- आपणा प्रत्येकात काही गुण असतात. त्या गुणांचा पूर्ण विकास होण्यासाठी प्रत्येकाला समान संधीची आवश्यकता असते. जेव्हा जात, धर्म, लिंग भेदाशिवाय सर्वांना समान संधी दिल्या जातात.
- तेव्हा प्रत्येकजण आपल्यातील सुप्तगुणांचा विकास करू शकतो. म्हणजेच मानवी हक्क हे सार्वत्रिक (universal) आहेत .

- मानवी हक्कांची संकल्पना काळानुसार बदललेली आढळते.
- आज आपण केवळ नागरी वा राजकीय अधिकारांचाच विचार करत नाही तर माहितीचा अधिकार अथवा प्रदूषण मुक्त पर्यावरणाचा अधिकार या सारख्या अधिकारांची चर्चा करतो म्हणजेच मानवी हक्क काळानुसार विकसित होणारे असतात.
- हे अधिकार आपल्याला जन्मत:च मिळतात ते आपल्यापासून कोणीही हिरावून घेऊ शकत नाही.
- ते आपल्याला कोणा समाजाने अथवा राज्यकर्त्यांने दिलेले नसतात म्हणजेच मानवी हक्क आपल्यापासून विलग करता येत नाहीत.
- प्रत्येक हक्कासोबत आलेले कर्तव्य व्यक्ती व राज्य यांच्यासाठी बधनकारक असत.
- उदा. आपणास जेव्हा प्रदूषण मुक्त पर्यावरणाचा अधिकार मिळतो तेव्हा पर्यावरणातील प्रदूषण टाळणे वा जास्त झाडे लावणे या सारखी कर्तव्ये आपल्याला पार पाडावी लागतात.

- प्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्यांवर कारवाई करणे हे मग राज्याचेही कर्तव्य ठरते.
- हक्क व कर्तव्य एकमेकांपासून विलग करता येत नाहीत. त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.
- बहुतांश हक्क हे राज्य व शासन यांनी केलेले मान्य असतात.
- हे हक्क राज्यघटनेत मूलभूत हक्कांच्या स्वरूपात समाविष्ट केले जातात म्हणजेच हक्कांना कायद्याची मान्यता असते.
- जरी आपण हे हक्क उपभोगत असलो तरी या हक्कांना राज्याने घालून दिलेली काही बंधने असतात.
- उदा. आपल्याला आपले विचार व्यक्त करण्याचे व बोलण्याचे स्वातंत्र्य आहे.

# मानवी हक्कांचा इतिहास

- मानवी हक्कांचा इतिहास खालील दस्तऐवजातून उलगडत  जातो.
- मॅग्ना कार्ट (१२१५)-मानवी हक्कांचा अर्थ सर्वप्रथम न इंग्लंडमध्ये मॅग्नाकाटीमध्ये सांगितला गेला. याच्या माध्यमातून ब्रिटिश नागरिकांना काही नागरी हक्क देण्यात आले.
- मॅग्नाकाटने मानवी हक्कांचा पाया रचला.
- बिल ऑफ राईटस् (१६८९) - इंग्लंडमध्ये बिल ऑफ राईट्स् मध्ये प्रचलित कायद्याची नोंदणी करून मानवी व हक्क स्वातंत्र्य यांची नोंद केली गेली.

• **अमेरिकी स्वातंत्र्याचा जाहीरनामा : (१७७६)** – यात सर्व व्यक्ती समान असून त्यांना अधिकार मिळाले पाहिजेत असे घोषित करण्यात आले.

• **फ्रेंच स्वातंत्र्याचा जाहीरनामा : (१७८९)** – फ्रेंच राज्यक्रांतीमध्ये स्वातन्त्र्य,समता, बधूता, व ' याची घोषणा झाली यात मानवी अधिकार सर्वांना मिळावेत याची चर्चा ही झाली.

• परंतु मानवी हक्कांचे महत्त्व दुसर्या महायुद्धानंतर वाढलेले दिसते.

• संयुक्त राष्ट्रानेही मानवी अधिकारांची सनद तयार करून ती १० डिसेंबर १९४८ रोजी मान्य केली. म्हणून हा दिवस दरवर्षी 'मानवीहक्क दिन' म्हणून साजरा केला जातो.

# मानवी हक्कांची सनद/जाहीरनामा

- संयुक्त राष्ट्राने १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी हक्कांचा जाहीरनामा घोषित केला.
- मानवाला आवश्यक असलेले स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुभाव यांचा समावेश केला आहे.
- या मानवी हक्कांच्या सनदेमध्ये प्रत्येकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य, स्वसंरक्षणाचे स्वातंत्र्य, शिक्षण घेण्याचे स्वातंत्र्य तसेच धर्म स्वातंत्र्य देण्यात आले आहे.
- प्रत्येकाला आरोग्य, नोकरी व सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा हक्क मान्य केला आहे.
- स्वातंत्र्याच्या अधिकारात सर्वांना शांततेत सभा घेण्याचा व संघटन करण्याचा हक्क तसेच पर्यटनाचा हक्कही देण्यात आला आहे.

GDC

- राजकीय स्वातंत्र्यामध्ये मतदानाचा अधिकार तसेच राजकीय प्रचार करण्याचा अधिकार व राजकीय जीवनात सक्रिय सहभागाचा अधिकार देण्यात आला आहे.
- सामाजिक सुरक्षेसाठी प्रत्येकाला शोषणा विरुद्धचा व भेदभावा विरुद्धचा अधिकारही देण्यात आला आहेवंश, वर्ण,लिंग, जात, धर्म इ. च्या आधारावर भेदभाव करता येणार नाही असेही यात नमूद केले आहे.
- आर्थिक स्वातंत्र्यामध्ये नोकरी, समान कामासाठी समान वेतन, विश्रांती, कामाच्या ठिकाणी योग्य वातावरण आणि विमा संरक्षण इ. चे अधिकार देण्यात आले आहेत.
- कोणाच्याही खाजगी जीवनात शासनाने अथवा इतर व्यक्तींनी हस्तक्षेप करू नये, अन्यथा यावर कायदेशीर उपाय करण्याचा हक्क दिला आहेकोणालाही मनमानी पद्धतीने अटक, स्थानबद्ध किंवा हद्दपार केले जाणार नाही याची तरतूद केली आहे.

- या सनदेनुसार कोणाचाही अमानवी छळ करणे तसेच अपमानास्पद वागणूक देणे यावर बंदी घालण्यात आली आहे.
- सामाजिक स्वास्थासाठी कालबाह्य प्रथा व बालमजुरी या सारख्या गोष्टींवर बंदी घालण्यात आली आहे.या सनदे द्वारा शारीरिक छळ, अन्याय, भेदभाव, असमानता आणि -मानसिक छळ थांबवण्याचा प्रयत्न केला गेला आहे.
- सर्व संयुक्त राष्ट्र सदस्यांसाठी ही सनद अनिवार्य आहे.
- संयुक्त राष्ट्राने जाहीर केलेल्या मानवी हक्कांच्या जाहीरनाम्यात सर्वात महत्त्वाचा अधिकार मान्य केला तो म्हणजे सन्मानाने जगण्याच्या अधिकार' यात सर्व व्यक्ती समान आहेत या तत्त्वावर भर देण्यात आला आहे.
- हा जाहीरनामा अनेक देशांच्या संविधान निर्मिती मध्ये प्रभावी ठरला आहे तसेच अनेक देशांच्या न्याय प्रक्रियेसाठी मार्गदर्शक घटक ठरला आहे.

# मानवी हक्कांचे वर्गीकरण

- मानवी हक्कांच्या जाहीरनाम्यात असे कोणतेही वर्गीकरण करण्यात आलेले नाही. मात्र मानवाधिकारांचा जसजसा विकास होत गेला तसतसे मानवी हक्कांचे वर्गीकरण करणे गरजेचे बनले.

- **मानवी हक्क**

1. नागरी व राजकीय हक्क
2. विकासात्मक अधिकार
3. सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक हक्क (सामुहिक हक्क)

# मानवी हक्कांच्या पायमल्लीस कारणीभूत असणारे घटक खालीलप्रमाणे:

## १) कुपोषण:

- नागरिकांच्या कुपोषणास विशेषत: मुलांच्या कुपोषणास अनेक घटक कारणीभूत ठरत असतात.
- नैसर्गिक आपत्ती,दारिद्रय, स्थलांतर यामुळे अनेकांना आपल्या मुलभूत गरजा भागवता येत नाहीत.
- हलाखीच्या आर्थिक परिस्थिती मुळेही नागरिक आपला उदरनिर्वाह करु शकत नाहीत.
- पोषक आहाराच्या अभावामुळे, कुपोषणाने अनेक बालके मृत्यू पावतात.

## २) संघर्ष :

- जगात वेगवेगळे संघर्ष हे दंगल किंवा हरताळ यामुळे निर्माण होतात. त्या काळात दवाखाने, शाळा बंद ठेवल्या जातात.
- विद्यार्थी शाळेत जाऊ शकत नाहीत आणि रुग्णांना आवश्यक ते औषधोपचार मिळत नाहीत.
- अशा रीतीने मुलांचा शिक्षणाचा अधिकार व रुग्णांचा जीविताचा अधिकार हिरावून घेतला जातो.

## ३) महिला व मुलांवर केलेले अत्याचार :

समाजातील हे दोन घटक सहजगत्या अत्याचारांना बळी पडतात त्यामुळे त्यांना पुरुषांसारखे अधिकार मिळत नाहीत.

त्यांचे अधिकार समाजाकडून नाकारले जातात किंवा त्यांची पायमल्ली होते. **अल्पवयीन मुली व स्त्रियांवर होणारे बलात्कार मुलीची विक्री, हुंडाबळी, सक्तीने मुलींना वेश्या व्यवसायाकडे**

ढकलणे यामुळे महिलांच्या अधिकारांची पायमल्ली होते.

मुलांच्या **शरीराला न पेलवणाच्या कृती त्यांच्याकडून** करवून



हुंडाबळी



कुपोषित बालक




बाल कामगार

# ४) तुरुंगातील स्थिती

वेगवेगळ्या कारणाने पुरेशी चौकशी न करताच अने व्यक्ती तुरुंगात ठेवल्या जातात. अशा कारागृहांची स्थिती वाईं असते.

कारागृहातील वाढणारी कैद्यांची संख्या, छोट्या जागे क्षमतेपेक्षा जास्त कैद्यांना ठेवले जाते. खोलीत मोकळी हवे नसते. सूर्यप्रकाश येत नाही.

शौचालयाची योग्य व्यवस्था नसते हे सर्व जरी कैदी असले तरी माणूस म्हणून त्यांना मूलभूत गोष मिळणे आवश्यक आहेया सोईअभावी महिला कैद्यांचे अवस्था तर जास्तच बिकट असते.

# ५) वांशिक संघर्ष

- वांशिक श्रेष्ठत्वाची भावना ही वांशिक संघर्षांना कारणीभूत ठरते.

अशा संघर्षात लहान मुले, स्त्रिया व निष्पाप जनता व अल्पसंख्याक बळी पडतात.

उदा. श्रीलंकेत सिंहली व तामिळी संघर्षांमध्ये हजारो नागरिकांची हत्या झाली.

## ६) पर्यावरणाची हानी:

- कारखान्यामधून वेगवेगळ्या प्रकारचे विषारी वायू बाहेर पडतात.
- हे वायू पाण्यात, शेतात व घरात शिरतात यातून मानवी शरीराला अपाय होतो.
- विकासाच्या नावाखाली जंगलांची मोठ्या प्रमाणात तोड केली जाते.
- तेथील आदिवासींना विस्थापित व्हावे लागते, त्यामुळे त्याच्या जगण्याचा अधिकार । हिरावून घेतला जातो.

# ७) दलितांवरील हल्ले

- भारतासारख्या लोकशाही देशातही दलितांवर हल्ले केले जातात.
- समाजातील अवमानकारक वागणूक व आर्थिक शोषणामुळे दलितांवर अन्याय होतो.
- त्यांच्यावरील अन्यायाच्या घटना आजही घडतात.
- त्यांचा सन्मानमने जीवनही जगता येत नाही.
- त्यांच्या मानवी हक्कांची अपेक्षा तर दूरच राहते.

# मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी केलेले उपाय

- मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना केल्या जातात
- या उपाययोजना दोन प्रकारच्या असतात.

अ) घटनात्मक उपाय

ब) घटनाबाह्य उपाय

# अ) घटनात्मक उपाय :

## १) मूलभूत अधिकार :-

- अनेक देशांमध्ये संविधानाने नागरिकांसाठी मूलभूत हक्क दिलेले आहेत.
- या हक्कांचे उल्लंघन व्यक्ती, संस्था, शासनाकडून किंवा कोणत्याही घटकाकडून होत असेल तर त्याविरुद्ध न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार नागरिकांना प्राप्त होतो. यामुळे त्यांच्या हक्कांचे संरक्षण होते.
- लोकांच्या अधिकारांच्या संरक्षणासाठी व विशेष वर्गाच्या अधिकारांच्या संरक्षणासाठी काही संस्थांची स्थापना केलेली आहे

# २) राष्ट्रीय मानवी हक्क आयोग

- भारतामध्ये मानवी हक्क आयोगाची स्थापना सन १९९३ च्या 'मानवी अधिकार संरक्षण कायद्याअंतर्गत करण्यात आली.
- मानवी अधिकारांचे उल्लंघन थांबवून प्रत्येक नागरिकाला न्याय मिळवून देण्यासाठी आयोग सक्रिय आहे.

# ३) राष्ट्रीय महिला आयोग

- या विशेष आयोगाची स्थापना करण्यात आला आहे.यात एक अध्यक्ष व पाच सदस्य असतात.
- यात कमीत कमी एक सदस्य अनुसूचीत जाती व एक सदस्य अनुसूचित जमातीचा असावा.
- हा आयोग महिलांना कायद्याने पुरवलेल्या सर्व संरक्षणांचा अभ्यास करतो.
- स्त्रियांवर होणारे अत्याचार,हिंसाचार,छळ, शोषण, हुंडाबळी,बलात्कार इ. मधून स्त्रियांवर होणारा अत्याचार कमी करण्याचा प्रयत्न हा आयोग करतो.

## ४) राष्ट्रीय अनुसूचित जाती व जमाती आयोग

- हा आयोग अनसचित जाती व जमातीचे संरक्षण करतो.
- जातीय वादाचे निर्मुलन करण्याचा प्रयत्न करतो आणि सामाजिक व आर्थिक प्रगतीचा पुरस्कार करतो.
- समानता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करतो.
- अत्याचाराच्या विरोधी (Atrocity) खटल्यात साहाय्यं करतो.

## ५) राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग

- या आयोगाची स्थापना १९९३ मध्ये झाली.
- या आयोगाला दिवाणी न्यायालयाचे  अधिकार असतात.
- केंद्रीय मागासवर्गीय यादीमध्ये नागरिकांच्या गटाचा अंतर्भाव करण्याच्या विनंतीची तपासणी हा कि आयोग करतो हे त्यांचे प्रमुख काम आहे

## ६) राष्ट्रीय अल्पसंख्यक आयोग

- हा आयोग देशातील अल्पसंख्याकाचे संरक्षण व त्यांच्यासाठीच्या विविध योजनांच्या कार्यवाहीसाठी काम करतो.
- या आयोगांच्या स्थापनेबरोबरच शासनाने मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी वेगवेगळे कायदे संमत केले आहेत.
- विशेषत: महिला, मुलेमागासवर्ग, अनुसूचित जाती, जमाती, ज्येष्ठ नागरिक व अपंग यांच्या हितरक्षणासाठी कायदे केलेले आहेत.

## ब) घटनाबाह्य उपाय

- अशासकीय संस्था व प्रसार माध्यमे यांचे कार्यही मानवी हक्क संरक्षणाचे घटना बाह्य उपाय या मध्ये येतात.

## १) अशासकीय संस्था

- मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी अशाच अनेक चळवळी निर्माण झाल्या. त्यांनी लढे उभारले. त्यात बऱ्याच  प्रमाणात यशही मिळाल्याचे दिसते.
- उदा. 'चिपको आंदोलनाचे प्रणेते सुंदरलाल बहुगुणा यांनी पर्यावरणाच्या रक्षणासाठी हे आंदोलन छेडले.
- जंगलांची होणारी बेसुमार तोड रोखणे व पर्यावरणाचे रक्षण करणे हे या चळवळीचे मुख्य उदिष्ट होते.
- मेधा पाटकर यांचे 'नर्मदा बचाव आंदोलन' हे विस्थापितांचा प्रश्न सोडवण्यासाठी झाले

# ॲम्नेस्टी इंटरनॅशनल

- मानवी हक्कांसाठी काम करणारी अशासकीय संस्था मानवी हक्कांच्या रक्षणासाठी काम करणारी जागतिक अशासकीय संस्था (NGO) मानवी हक्कांच्या जाहीरनाम्यात नमूद केलेल्या मानवी हक्कांचा आदर करण्यासाठी प्रयत्न करते.
- मानवी हक्क हे अविभाज्य व  परस्परावलंबी आहेत असा ॲम्नेस्टी इंटरनॅशनलचा विश्वास आहे. ही संस्था हक्कांसंबंधीचा अहवाल तयार करून प्रकाशित करते.
- अनेक देशात शासना विरुद्धही अहवाल प्रदर्शित न केले आहेत, त्यामुळे अनेक देशातील सरकारे नाराज झाली.
- या अहवालांना मानवी हक्कांसाठी खूप महत्त्व आहे

# ह्युमन राईट्स वॉच :

- मानवी हक्कांसाठी काम करणारी अशासकीय संस्था
- हयूमन राईट्स वॉच ही जागतिक अशासकीय NGO) संस्था आहे.
- ही मानवी हक्कांसंबंधी कार्य करणारी व संशोधन करणारी अमेरिकेतील सर्वात मोठी संस्था आहे. मानवी हक्कांच्या पायमल्ली संबंधी जागतिक प्रसारमाध्यमांचे लक्ष वेधून घेते.
- ही सैनिकांच्या वापरा विरुद्ध आवाज सस्था बाल उठवते.

## २) प्रसारमाध्यमे :

- रेडिओ, टीव्ही. वृत्तपत्रे, नियकालिके, इंटरनेट, टेलिफोन, फंक्स इ. स्रोतांना प्रसारमाध्यमे म्हणता येईल.
- या माध्यमांनी मानवी हक्कांची जोपासना करण्याचा प्रभावी प्रयत्न केला व जनजागरण
- घडवून आणले आणि लोकमत संघटित केले.
- प्रभावी प्रसार माध्यमे मानवी हक्कांच्या संरक्षणाची जबाबदारी मोठ्या प्रमाणावर पार पाडतात.

# माध्यमांची भूमिका

१) मानवी हक्कांबाबत सातत्याने जागरूकता घडवून आणली जात आहे.

२) अस्पृशता निवारण, हुंडाबळी, स्त्री-पुरुष समानता या सारख्या आंदोलनांना मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळवून

३) भोपाळ गॅस गळती पीडितांचे आंदोलन, नर्मदा बचाओ आंदोलन, ओरिसातील पास्को प्रकल्पा विरोधी आंदोलन अशा अनेक आंदोलननांना प्रसिधी दऊन त्यांनी जनतेचे लक्ष वेधले आहे.

- प्रसार माध्यमे मानवी हक्कभंग जनतेसमोर आणतात. है माध्यमे घटनाबाह्य संरक्षक म्हणून काम करतात.
- मानवी हक्क भंगाच्या नोंदी ठेवून त्या घटना परत घडणार नाहीत यासाठी जनजागृती करतातअन्यायकारक घटनांना प्रसिद्धी देऊन ते लोकांचा आवाज बुलंद करतात व शासनावर दबाव आणतात. '

# Thank You !!